# मुंबई मेट्रो-३ चे ८४.३ टक्के काम पूर्ण !

## पहिल्या टप्प्याचे ९१ टक्के, तर दुसऱ्या टप्प्याचे ७९ टक्के काम पूर्ण; येत्या जूनपर्यंत सुरू होण्याची शक्यता

**मुंबई : पुढारी वृत्तसंस्था**

मुंबईतील भूमिगत मेट्रो-३ चे काम दोन टप्प्यात सुरू असून यातील दोन टप्प्याचे एकूण काम ८४. ३ टक्के पूर्ण झाल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दिली आहे. यात पहिल्या टप्प्याचे काम ९१ टक्के तर दुसऱ्या टप्प्याचे काम ७९ टक्के पूर्ण झाले आहे. यातील पहिला टप्पा हा आरे ते बीकेसी असून दुसरा टप्पा बीकेसी ते कफपरेड असून कफपरेड ते आरे असा आहे. ही संपूर्ण भूमिगत मेट्रोसेवा जून २०२४ पर्यंत पूर्ण क्षमतेने सुरु करण्याचा मुंबई मेट्रोचा मानस आहे. यामुळे येणाऱ्या वर्षात मुंबईकरांना या रेल्वेची सेवा अनुभवता येणार आहे.



### कोणत्या टप्प्याची किती कामे झाली ?

- पहिला टप्पा : आरे ते बीकेसी
- ९१ टक्के काम झाले आहे.
- स्थानके आणि बोगद्याची कामे - ९८.३ %
- यंत्रणा उभारण्याची कामे - ७५. ५ %
- स्थानकांची कामे - ९९ टक्के

विद्युत तारांची कामे - ६४.२ टक्के

- दुसरा टप्पा : बीकेसी ते कफपरेड
- ७९ टक्के काम झाले आहे.
- यात स्थानके आणि बोगद्याची कामे - ९६.२ %
- यंत्रणा उभारण्याची कामे - ४७.१ %
- स्थानकांची कामे - ९०.५ टक्के

विद्युत तारांची कामे - ४७.६ टक्के

मेट्रो ३ हा भारतातील पहिला भुमिगत रेल्वे प्रकल्प असून त्याची एकूण लांबी ३३.५ किमी लांबीची असेल आणि कफ परेड ते आरे कॉलनीपर्यंत २७ स्थानके असतील. पहिल्या टप्प्यात आरे ते बीकेसी मार्ग डिसेंबर अखेरपर्यंत मुंबईकरांसाठी खुला केला जाणार आहे. ही संपूर्ण मेट्रोसेवा जून २०२४ पर्यंत पूर्ण क्षमतेने सुरु करण्याचा मुंबई मेट्रोचा मानस आहे.

मुंबई मेट्रो कॉर्पोरेशन दिलेल्या माहितीनुसार एकूण प्रकल्पाचे काम ८४.३ टक्के झाले आहे. यातील एकूण बांधकामाशी निगडीत ९४.९ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. तर स्थानके उभारण्याचे काम ९२ टक्के झाले आहे. बोगद्याची कामे १०० टक्के पूर्ण झाली असून ५७ टक्के यंत्रणांची उभारणी झाली आहे. डेपोचे काम ७४.४ टक्के, रेल्वे रुळांचे काम ६८.४ टक्के काम पूर्ण झाल्याचे कार्पोरेशनने सांगितले आहे.